**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. २५/२०१७-१८/२९९ दिनांक: १६.१०.२०१७

**आदेश**

**आदेश केस क्र. २५/२०१७-२०१८**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. पांडूरंग बाबू म्हातुगडे<br>गट क्र.१६५० सोनाळी ता कागल जि.कोल्हापूर<br>पत्ताः- विकली मार्केटशेजारी इचलकरंजी<br>ता. हातकणंगले जि. कोल्हापूर : | **तक्रार अर्जदार (ग्राहक)** |
| | **विरुध्द** | |
| १) | कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, कोल्हापूर | |
| २) | कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>ग्रामिण विभाग-२ कोल्हापूर | **विरुध्द पक्षकार** |
| ३) | उपकार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>उपविभाग मुरगुड | |

**कोरमः-** १. श्री. प्र.वि. खपली, सदस्य सचिव,
२. श्री. पी. एस. बुरांडे, ग्राहक सदस्य,

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**निर्णय**

मी प्र.वि.खपली सदस्य सचिव, ग्राहक तक्रार.निवारण मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

## गा-हाण्याचे संक्षिप्त स्वरुप.

१) तक्रारदार श्री पांडूरंग बाबू म्हातुगडे ,गट क्र. १६५० सोनाळी ता कागल जि.कोल्हापूर येथील शेतामध्ये कृषि पंप विज जोडणीसाठी दि. १५.०५.२०१७ रोजी अनामत रक्कम भरली आहे.त्यानी पावती क्र. ४१४७९९७ नुसार रु. ६,२००/- भरले आहेत. त्याना नियमाप्रमाणे विज जोडणी मिळाली नाही. म्हणून अंतर्गत तक्रार निवारण कक्ष,कोल्हाउपूर येथे अर्ज केला होता तेथे जेष्ठता यादीनुसार विज जोडणी देण्यात येईल असा निकाल देण्यात आला तो त्याना मान्य नसल्यामुळे त्यानी अ फॉर्ममध्ये मंचासमोर अर्ज केला आहे आणि त्वरीत विज जोडणीची मागणी केली आहे. तसेच विलंब भरपाई आणि कर्मचा-याकडून सौजन्यपूर्ण वागणूकीची अपेक्षा व्यक्त केली आहे.

## वि. प. यांची भूमिका.

२) तक्रारदार यांनी वरील प्रमाणे अर्ज दि. २०-०३-२०१७ रोजी दाखल करुन दि. १५-०५-२०१७ रोजी रक्कम भरणा केली हे वि.प. यांना मान्य आहे. तक्रारदार यांना वीज जोडणी देणेसाठी ०.०६ कि.मी लघुदाब वाहिनी आवश्यकता आहे. सदर कामास इन्फ्रास्ट्रक्चर लागत असून नियमानुसार त्यांना वीज जोडणी देणेत येत आहे.

३) मुरगुड उपविभाग अतंर्गत असणारी शेती पंपाकरिता आवश्यक असणारी विद्युत संच उभारणीची कामे ही प्रतिक्षा यादी मधील दि. २३-०७-२०१४ अखेरपर्यन्तची इन्फ्रा लेफ्ट .आऊट या टेंडर मधून पूर्ण करणेत आलेली आहेत. सदर ग्राहकाचे नाव सन-२०१७-१८ सालातील प्रतिक्षा यादीमध्ये ७४ व्या क्रमांकास असून सदर आवश्यक ०.०६ कि.मी. लघुदाब वाहिनी उभारणीचे काम पूर्ण झालेनंतर ग्राहकास विद्युत जोडणी देता येणे शक्य आहे.

४) या प्रकरणाची सुनावणी दिनांक १२-१०-२०१७ रोजी मंचासमोर घेणेत आली. त्यावेळी तक्रारदार स्वत: हजर होते. वि.प. तर्फे उपकार्यकारी अभियंता श्री बी.ए.भोळे हजर होते. त्यांचे तोंडी युक्तिवाद ऐकणेत आले. उपलब्ध कागदपत्रे वाचणेत आली आहेत.

५) या मंचाच्या निर्णयासाठी खालील मुद्दे उपस्थित होत आहेत.

१) तक्रारदार यांना त्यांच्या मागणीनुसार शेती पंपासाठी नवीन वीज जोडणी निश्चित कालावधीत देण्याचा आदेश करणे योग्य होईल काय?

उत्तर:- होय.

२) कोणता अंतिम आदेश?

उत्तर:- शेवटी नमूद केल्याप्रमाणे.

CONS. GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD. महावितरण

## कारणमिमांसा

६) नविन वीज जोडणी लौकरात लौकर मिळावी एवढीच विनंती तक्रारदार यांनी मंचासमोर केली आहे. त्यांनी वि.प.कडे रक्कम भरल्यानंतर त्यांना नियमानुसार तीन महिन्यात वीज जोडणी मिळालेली नाही. तक्रारदार यांना वीज पुरवठा करण्यासाठी वर परिच्छेद-३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे लघुदाब वाहिनीचा विस्तार करावा लागणार आहेत. नविन उपकेंद्र उभारणेची गरज नाही. तक्रारदार यांची नावे प्रतिक्षायादीत विशिष्ट क्रमांकास नोंद आहेत. याबाबत फारसा विचार करता येणार नाही.

७) विशिष्ट मुदतीत वीज पुरवठा देणे कायद्याने वि.प. यांचेवर बंधनकारक आहे. तसे न केल्यास विद्युत कायदा २००३ च्या कलम ४३(३) मध्ये दंडात्मक तरतूद केली आहे. कृतीमानके विनियमाप्रमाणे वीज जोडणी देण्यात विलंब झाल्यास भरपाई देण्याची तरतूदही विद्युत नियामक आयोगाने केली आहे. त्यामुळे "प्रथम येणा-यास प्रथम प्राधान्य" तत्वाचा उपयोग वि.प. यांना करता येत नाही.

८) या केसमध्ये तक्रारदार यांनी ३ महिन्यामध्ये विज पुरवठा मिळाल्यास नुकसान भरपाईची मागणी रद्द करण्याचे मंचासमोर तोंडी मान्य केले आहे. कर्मचा-यानी ग्राहकाशी सौज्यनपूर्ण वागणूक ठेवावी असे मंच सूचित करीत आहे.

## आदेश

१) तक्रारदार यांना त्यांच्या मागणी प्रमाणे शेती पंपासाठी नविन वीज जोडणी वि.प. यांनी दि. १०.०१.२०१८ पर्यन्त देऊन वीज पुरवठा चालू करावा असा वि.प. यांना आदेश देणेत येत आहे.

२) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

४) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

दिनांक ०१.०७.२०१७ पासून अध्यक्ष पद रिक्त आहे.

(श्री प्र. स. बुरांडे)
ग्राहक सदस्य

16/10
(प्र.वि. खपली)
सदस्य सचिव

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण